# मत्स्यव्यवसाय विभाग जालना

| | |
|---|---|
| विभागाचे नांव | मत्स्यव्यवसाय विकास विभाग |
| कार्यालयाचा पत्ता | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय , कार्यालय , प्रशासकीय ईमारत , दुसरा माळा जालना. |
| कार्यालयाचा दुरध्वनी क्रंमाक | ( ०२४८२ ) २२५१९१ |
| कार्यालय प्रमुखाचे नांव व पदनांम | श्री. स.रा. साबळे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय ,जालना. |
| मंजुर पदाची संख्या( भरलेली व रिक्त पदे ) | मंजुर पदे :- १४<br>भरलेली पदे :- ०९<br>रिक्त पदे :- ०५ |

## मत्स्यव्यवसाय विभाग योजना ( केंद्र शासन, राज्य शासन )

### जिल्हा पातळीवरील योजना : -

### १. मत्स्यबीज केंद्राचे बांधकाम/सुधारणा/आधुनिकीकरण .

१. नियोजन विभाग पत्र क्रमांक जिवायो-१००९ / प्र.क्र.२१३/का -१४८१ दि.३०/१२/२००९
२. शासन निर्णय क्रमांक मत्स्यवि-२४१०/५२६/ प्र.क्र.१०५/१०/पदुम-१३ दि.०७/१०/२०१०

मुख्य उदेश :-

राज्यात गोडया पाण्यातील मत्स्योत्पादनासाठी उपलब्ध जलक्षेत्रात इष्टतम पातळीवर मत्स्यबीज संचयन करण्यासाठी सातव्या पंचवार्षिक योजनेअखेर पर्यंत मत्स्यबीज आयात करण्यांत येत असे .मत्स्यबीज उत्पादनाचे क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्यासाठी आधुनिक तंत्राचा वापर करुन मत्स्यबीज उत्पादन वाढविण्यासाठी वर्तुळाकार उबवणी संचाची स्थापना करण्यांत आली

### २) अवरुद्व पाण्यांत मत्स्यसंवर्धन :-

१. नियोजन विभाग पत्र क्रमांक जिवायो-१००९ / प्र.क्र.२१३/का -१४८१ दि.३०/१२/२००९
२. शासन निर्णय क्रमांक मत्स्यवि-२४१०/५२७/ प्र.क्र.१०४/१०/पदुम-१३ दि.१८/०९/२०१०

मुख्य उदेश :-

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आरंभापासून अवरुद्व पाण्यात मत्स्यसंवर्धन ही योजना राज्यात राबविण्यांत येत आहे . मत्स्यसंवर्धनास योग्य असलेल्या जलक्षेत्रात मत्स्यबीज संचयन करण्यात येऊन मत्स्यशेतीद्वारे गोडया पाण्यातील मत्स्योत्पादन वाढविणे हा या योजनेचा हेतू आहे . मत्स्यव्यवसाय विभागाकडून नवीन निर्माण होणा-या तलावात जलद वाढणा-या जातीचे स्थानिकरित्या निर्माण केलेले मत्स्यबीज संवर्धकांना पुरवून तलाव/जलाशयामध्ये मत्स्यशेती करण्यास प्रोत्साहन देण्यात येते . या योजनेअंतर्गत सन १९९१ पर्यंत मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना आयात केलेल्या मत्स्यबीजावर ३३ टक्के अनुदान देण्यात येत असे.

सध्या जिल्हयांतील नवीन तयार झालेल्या तलावामध्ये जलद वाढणा-या मत्स्यबोटूकलीची शासनामार्फत सर्वसाधारण योजनेत पहिले २ वर्षे इष्टतम संचयनाच्या १००% व ३ -या वर्षी ७५% , ४ थ्या वर्षी ५०% व ५ व्या वर्षी २५% मत्स्यबोटूकली साठवणूक करण्यांत येते . याचबरोबर विशेष घटक योजना /आदिवासी विकास कार्यक्रमाअंतर्गत विशेष बाब पहिले ५ वर्ष १००% इष्टतम संचयन करण्यांत येते .

### 3) मासेमारी साधनांच्या खरेदीवर अर्थसहाय :-

१.नियोजन विभाग पत्र क्रमांक जिवायो-१००९ / प्र.क्र.२१३/का -१४८१ दि.३०/१२/२००९

२. शासन निर्णय क्रमांक मत्स्यवि-२४१०/ प्र.क्र.२४७/पदुम-१४ दि.२८/०९/२०१०

मुख्य उदेश :-

मच्छिमाराकरिता लागणा-या साहित्याच्या किंमतीमध्ये भरमसाठा वाढ होत असल्यामुळे गरिब मच्छिमाराना मच्छिमार साधने वापरुन किफायतशिरपणे मासेमारीचा व्यवसाय करता यावा . यास्तव सवलतीच्या दरात मच्छिमारांना मच्छिमार साधने उपलब्ध करुन देणे ,हा या योजनेचा मुख्य उददेश आहे .

या योजनेत मच्छिमार सहकारी संस्थेच्या सभासदांना प्रतीवर्षी प्रत्येकी ५ किलो नायलॉन सुत / जाळे खरेदीच्या मुळ किंमतीच्या ५०% अनुदान देण्यांत येते . याशिवाय सदर योजनेअंतर्गत मासेमारीसाठी आवश्यक असलेल्या होडया खरेदी करण्यांस देखील मुळ किंमतीच्या ५०% टक्के परंतु रुपये ३०००/- मर्यादेपर्यंत अनुदान देण्यांत येते .

## ४) मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचा विकास :-

१. नियोजन विभाग पत्र क्रमांक जिवायो-१००९ / प्र.क्र.२१३/का -१४८१ दि.३०/१२/२००९

२. शासन निर्णय कéषी व सहकार विभाग क्रमांक एफ एस एस/१७६८/३०३२४/सी-०४ दि.१७/१०/१९८९

मुख्य उदेश :-

मच्छिमार सहकारी संस्थांच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी संस्थेची पत वाढावी व संस्थेच्या व्यवस्थापनात सुधारणा व्हावी ,या योजनेचा उदेश आहे .

या दृष्टीने संस्थांना त्यांच्या सभासद भागभांडवलाच्या तीनपट तथापि रु. १००००/- च्या मर्यादित शासकीय भागभांडवल व पहिले ३ वर्ष रु.५००/- व पुढील २ वर्ष रु.२५०/- व्यवस्थापकीय अनुदान देय आहे . तसेच सदर योजनेत जिल्हा मच्छिमार संघास रुपये २५०००/- च्या मर्यादित शासकीय भागभांडवल व पहिले ३ वर्ष रु.५०००/- व पुढील २ वर्ष रु.२५००/- व्यवस्थापकीय अनुदान देय आहे .

सदरील भागभांडवल अर्थसहायाची मंजूरी नंतरच्या ६ व्या वर्षापासून समान १० हप्त्यांत परतफेड करावयाची आहे.

## ५) मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणा (केंद्र शासन पुरस्कृत.)

१. शासन निर्णय क्रमांक मत्स्यवि-२००० / २०७४०/प्र.क्र.१६२/पदुम-१३ दि.१२/११/२००१

मुख्य उदेश :-

मत्स्यसंवर्धनास उत्सुक असणा-या शेतक-यांना त्यांच्या पाणथळ/निकृष्ट शेत जमिनीत तळी बांधकाम करण्यासास प्रोत्साहन देणे, निवडक ५ हेक्टर पर्यंतच्या तलावात मत्स्यबीज संचयन व निविष्ठा वापरासाठी अर्थसहाय देणे, मत्स्यसंवर्धनापासून उत्पादित मासळी विक्री पर्यंतच्या कामात एकसुत्रात आणणे व मत्स्योत्पादनाची पातळी प्रति हेक्टर ३००० किलो पर्यंत गाठणे हा या योजनेचा उदेश आहे .

उपरोक्त योजनेत राबविण्यात येणा-या विविध योजना व त्यावरील अनुज्ञेय अनुदानाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| (रू. लाखात) अ.क्र. | योजना | प्रति हेक्टरी खर्च | देय अनुदान | |
|---|---|---|---|---|
| | | | २०% सर्वसाधारण लाभार्थी | २५%अनुसूचित जाती / जमाती लाभार्थी |
| १ | तळी बांधकाम | ३.०० | ०.६० | ०.७५ |
| २ | तळी नुतनीकरण | ०.७५ | ०.१५ | ०.१८ |
| ३ | प्रथम वर्ष निविष्ठा | ०.५० | ०.१० | ०.१२५ |
| ४ | गोडया पाण्यातील मत्स्यबीज उबवणी केंद्र | १२.०० | १.२० (सपाट भागात) | १.६० (डोंगराळ भागात) |
| ५ | मत्स्यखादय विभाग उभारणी | ७.५० | १.५० | -- |
| ६ | शोभिवंत माशांसाठी उबवणी केंद्राची उभारणी | १५.०० | १.५० | -- |

## जिल्हा वार्षिक योजना अतंर्गत वर्षनिहाय आर्थिक व भोतिक साध्याची माहिती

| अ क्र | विकास क्षेत्र/उपक्षेत्र/ योजना/प्रकल्पाचे नाव | सी.आर.सी. क्रंमाक | उद्यिष्ट शिर्ष | वर्ष | एकुण खर्च | भोतिक साध्य | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | बाब | परिमाण | साध्य |
| १ | २ | ३ | ४ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| २६ | मत्स्यबीज केद्राचे बांधकाम / सुधारणा / आधुनिकीकरण | २४०५२९९१ | २१ | २०११-१२ | २.५० | म.बीज उत्पादन | लाखात | ३२.९५ |
| | | | | २०१२-१३ | -- | म.बीज उत्पादन | लाखात | -- |
| | | | | २०१३-१४ | -- | म.बीज उत्पादन | लाखात | -- |
| २७ | मच्छिमार सहकारी संस्थाना सहाय्य | | | | | | | |
| | १.अवरुध्द पाण्यातील मत्स्यसंवर्धन | २४०५४९६५ | ३३ | २०११-१२ | -- | झींगा बीज संचयन | लाखात | ७४.५३ |
| | | | | | | म. बीज संचयन | लाखात | २९१.३७ |
| | | | | | | मत्स्योत्पादन | मे. टन | २७९० |
| | | | | २०१२-१३ | -- | झींगा बीज संचयन | लाखात | -- |
| | | | | | | म. बीज संचयन | लाखात | -- |
| | | | | | | मत्स्योत्पादन | मे. टन | ७२१ |
| | | | | २०१३-१४ | १.५० | झींगा बीज संचयन | लाखात | -- |
| | | | | | | म. बीज संचयन | लाखात | १३१.८३ |
| | | | | | | मत्स्योत्पादन | मे. टन | १३० |
| | २.मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थाचा | २४०५४९६५ | ३३ | २०११-१२ | ०.१० | मत्स्य . संस्थांना भाग भांडवल | संस्था संख्या | ०१ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | विकास | | | २०१२-१३ | -- | मत्स्य . संस्थांना भाग भांडवल | संस्था संख्या | -- |
| | | | | २०१३-१४ | ०.२० | मत्स्य . संस्थांना भाग भांडवल | संस्था संख्या | ०२ |
| ३६ | मच्छिमारी साधने | २४०५०६५६ | ३१ | २०११-१२ | -- | नायलॉन सुत | किलो | -- |
| | | | | २०१२-१३ | -- | नायलॉन सुत | किलो | -- |
| | | | | २०१३-१४ | ०.३० | नायलॉन सुत | किलो | २०२.०० |

जालना जिल्हयातील तलाव / तलाव ठेका महसुल वसुली बाबत माहिती.

| अ.क्र. | वर्ष/सन | तलाव (संख्या) | ठेक्याने गेलेले तलाव | ठेक्याने न गेलेले तलाव | तलाव ठेक्यापोटी वसुल महसुल (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| ३ | २०११-१२ | ६२ | ६१ | ०१ | १०११९१२/- |
| ४ | २०१२-१३ | ६६ | ६५ | ०१ | १०४८४८३/- |
| ५ | २०१३-१४ | ६६ | ६५ | ०१ | १८५९५०/-(सन २०१३-१४ करीता जिल्हयात अवर्षण परिस्थितीमुळे जिल्हयातील एकुण ५० तलावांना रु.८०१३६३/- ची ठेका माफी देण्यात आलेली आहे.) |
| ६ | २०१४-१५ नोव्हेंबर २०१४ अखेर | ६६ | ६१ | ०५ | ६८२०५४०/-<br>०५ तलाव ठेक्याने देण्याची कार्यवाही सुरु आहे. |